## महत्त्वाचे



नॉर्टन (मॅचॅस्युसेट्स): टीपीसी बूस्टन येथे आयोजित डची बॅंक चॅम्पियनशिपच्या दुसऱ्या फेरीतील नवव्या टी शॉट मारताना टॉनी फिनाऊ.

### भारतीय त्रिकुट कटपासून वंचित

स्पिक (नेदरलॅंड): भारतीय गोल्फर एसएसपी चौरासिया, चिराग कुमार आणि जीव मिल्खा सिंग येथे केएलएम ओपन गोल्फ टूर्नामिंटमध्ये कट प्राप्त करण्यापासून वंचित राहिले. पहिल्या फेरीत तीन अंडर ६८ चे स्कोअर करणारा चौरासिया दुसऱ्या फेरीमध्ये चार ओव्हर ७५ च्या स्कोअरनंतर कटपासून वंचित राहिला. चिराग (७६ आणि ७२), जीव (७५ आणि ७६) हेदेखील कट प्राप्त करू शकले नाहीत.

### अनंत, विष्णू यांनी घेतली आघाडी

कोईम्बतूर: १९ व्या राष्ट्रीय रेसिंग स्पर्धेच्या दुसऱ्या राउंडमध्ये शनिवारी अत्यंत अटीतटीच्या लढतीत यूरो जेके १६ आणि एलजीबी फॉर्म्युला ४ रेस गटात अनंत षण्मुगम आणि विष्णूप्रसाद यांनी सहजतेने विजय नोंदवला. जेके टूरिंग कारच्या श्रेणीतील चॅम्पियनशिप विजेता आशिष रामास्वामीला कोणताही रेसर आव्हान देऊ शकला नाही. आशिषने सलग आपल्या तिसऱ्या रेसमध्ये विजय नोंदवला.

### दिल्ली डायनामोजमध्ये गाद्जेचे पुनरागमन

नवी दिल्ली: दिल्ली डायनामोज फुटबॉल क्लबने आपल्या संघाला आणखी भक्कम करण्यासाठी घानाचा स्टार फॉरवर्ड रिचर्ड गाद्जेच्या संघामध्ये पुनरागमनाची शनिवारी घोषणा केली आहे. दिल्ली डायनामोजने यासोबतच सेनेगलचा सेंटर बॅक इब्राहिम नियासलादेखील इंडियन सुपर लीगच्या पुढील सत्रासाठी संघामध्ये स्थान दिले आहे.

**११ डिसेंबर रोजी आयोजन :** प्रतिष्ठित नागरिक, दिग्गज खेळाडूही धावणार

# लोकमत समूहातर्फे औरंगाबाद मॅरेथॉन

**औरंगाबाद :** तंदुरुस्तीसाठी धावणे हा जणू काही देशांत छंदच बनला आहे आणि त्याला ऐतिहासिक औरंगाबाद शहरही अपवाद नाही. धावण्याविषयी आणखी जागरूकता निर्माण व्हावी आणि तंदुरुस्तीचा संदेश नागरिकांत रुजवावा या उदात्त हेतूने लोकमत समूहातर्फे ११ डिसेंबर रोजी शहरातील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या औरंगाबाद अर्ध मॅरेथॉनचे भव्यदिव्य आयोजन करण्यात येणार आहे.

लोकमत समूहातर्फे याआधी एपीएलमध्ये क्रिकेट आणि विविध खेळांचा समावेश असणाऱ्या क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करून खेळाडूंना मोठे व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले आहे. आता लोकमत समूहाने औरंगाबाद अर्ध मॅरेथॉनद्वारे उपक्रम राबवण्याच्या दृष्टीने आणखी एक स्तुत्य पाऊल टाकले आहे.

हे आयोजन मॅरेथॉनप्रती उत्साह दाखवणारे, अनुभवी धावपटू, मनोरंजन म्हणून धावणारे आणि मॅरेथॉनमध्ये आपली कारकीर्द करू पाहणाऱ्या अशा सर्व धावपटूंसाठी आहे. नागरिकांत तंदुरुस्ती राहण्यासाठी प्रेरणा देण्याचा हा एक प्रयत्न आहे.

फिटनेसचा संदेश देणारी ही अर्ध मॅरेथान ५ कि. मी.ची ‘फन रन’ (रन फॉर पॅशन), दहा कि. मी.ची पॉवर रन (प्राथमिक ते उच्च पातळीपर्यंत) आणि २१ कि. मी. अशी असणार आहे.

आयोजक या सुरेख संकल्पनेविषयी खूप उत्साहित असून, हे भव्यदिव्य आयोजन यशस्वी होईल याचा त्यांना विश्वास आहे. या आयोजनाविषयी रुचिरा दर्डा म्हणाल्या, ‘‘औरंगाबादमधील नागरिक, खेळाडूंना फिटनेससाठी प्रेरणा मिळावी हा आमचा प्रयत्न आहे. अशा प्रकारच्या भव्यदिव्य मॅरेथॉन आयोजनामुळे वैयक्तिकपणे क्षमतेचा कस लागतो. क्रीडाप्रेमींना प्रेरित करून त्यांनी सक्रियपणे फिटनेसवर लक्ष केंद्रित करावे आणि एक शिस्तबद्ध धावपटू कशाप्रकारे अद्भुत यश प्राप्त करू शकतो हे अर्ध मॅरेथॉनद्वारे दाखवणे हादेखील या आयोजनामागे उद्देश आहे.’’

या अर्ध मॅरेथॉनमध्ये शहरातील प्रतिष्ठित नागरिकांप्रमाणेच अनेक दिग्गज खेळाडू सहभागी होऊन या स्पर्धेच्या भव्यदिव्यतेत भर टाकतील. आयोजक धावपटूंसाठी लवकरच रनिंग क्लबची स्थापना करणार आहेत. मोठ्या स्पर्धेच्या तयारीसाठी आठवड्याअखेर ‘रनिंग ट्रायल’देखील घेण्यात येईल.

औरंगाबाद अर्ध मॅरेथॉन ही स्थानिक खेळाडूंना त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक सुवर्णसंधी असणार आहे. या मॅरेथॉन स्पर्धेसाठी तब्बल ५ लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

१० कि. मी. व अर्ध मॅरेथॉनमध्ये अव्वल ठरणाऱ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल्सही दिली जाणार आहेत. ही मॅरेथॉन १. सिटी रन (शहराचे प्रतिनिधित्व करणारे), २. क्लब रन (५ कि. मी.त क्लबचे प्रतिनिधित्व करणारे), ३ कॉलेज रन (५ कि. मी. मॅरेथॉनमध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारे), ४. कॉर्पोरेट रन (५ कि. मी.मध्ये कंपनीचे प्रतिनिधित्व करणारे).

या मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी वेबसाईट mycitymarathon.com येथे आपल्या नावाची नोंदणी करावी, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.




### असा असणार मार्ग

- हाफ मॅरेथॉन गारखेडा परिसरातील विभागीय क्रीडा संकुलापासून सुरु होईल.
- ही मॅरेथॉन शहानूरमियॉं दर्गा, हॉटेल अमरप्रीत, सतीश मोटर्स शोरुम मार्गे निराला बाजार येथे पोहेचेल.
- त्यानंतर धावपटू मिल कॉर्नर, आमखास मैदान, नौबत दरवाजा, किलेअर्क, दिल्ली गेट, हडको कॉर्नर, टीव्ही सेंटर, बळीराम पाटील हायस्कूल, बजरंग चौक, जळगाव रोड, हॉटेल लेमन ट्री, सेव्हन हिल पूल, गजानन महाराज मंदिर अशा मार्गाने जाईल.
- मॅरेथॉनचा समारोप विभागीय क्रीडा संकुलावर होईल.



छावणी गणेश महासंघातर्फे आयोजित हॉकी स्पर्धेत यशस्वी हॉकी संघाला बक्षीस प्रदान करताना मान्यवर. सोबत ब्रिगेडियर अनुराग वीज, अशोक सायन्ना, किशोर कच्छवाह, राज्य हॉकी संघटनेचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, डॅनियल फर्नांडिस, किशोर परदेशी, वजीर शेख आदी.

## ५ अ साईड हॉकी स्पर्धेत परमवीर क्रीडा मंडळ अजिंक्य

**औरंगाबाद : गणेश** महासंघ छावणीतर्फे आयोजित ५ अ साईड हॉकी स्पर्धेत परमवीर क्रीडा मंडळ आणि पी. एम. महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात परमवीर क्रीडा मंडळाने क्रीडा प्रबोधिनी संघावर ५-२ अशी मात केली. मुलांच्या गटातील अंतिम सामन्यात पी. एम. महाविद्यालय ब संघाने पी. एम. महाविद्यालय ब संघावर ३-१ अशी मात केली. विजेत्यांना ब्रिगेडियर अनुराग वीज, अशोक सायन्ना, किशोर कच्छवाह, राज्य हॉकी संघटनेचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, डॅनियल फर्नांडिस यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वजीर शेख, किशोर परदेशी, प्रशांत तारगे, संजय आडणे, डॅनियल फर्नांडिस, नितीन परदेशी, आशिष चेटी, शेख समीर, शेख रफिक, शामसुंदर भालेराव, संजय तोटावाड आदींनी परिश्रम घेतले.

## वेदांतला सुवर्ण



**औरंगाबाद :** शालेय कराटे स्पर्धेत वेदांत लगामे याने सुवर्णपदक पटकावले. या यशाबद्दल शाळेचे चेअरमन संदीप पाटील, मुख्याध्यापिका विजयश्री बारगळ, क्रीडा शिक्षक संतोष पाल, प्रेमराज पैठणे यांनी त्याचे अभिनंदन केले.

## ज्ञानोबा मुंढे महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस्, गाईडस्च्या अध्यक्षपदी



**औरंगाबाद : येथील** ज्ञानोबा मुंढे यांची महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् संघटनेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

अध्यक्षपदाचा कालावधी हा पाच वर्षांचा असणार आहे. याआधीही ज्ञानोबा मुंढे हे दोन वेळेस उपाध्यक्ष होते व गेल्या २० वर्षांपासून या चळवळीत ते सक्रिय आहेत.

स्काऊट आणि गाईडस्चे देशभरात ४५ लाख गाईडस् आहेत व ही चळवळ जगभरात असून, महाराष्ट्रात १५ लाख स्काऊट व गाईडस् असल्याचे मुंढे यांनी सांगितले.

स्काऊट व गाईडस्मध्ये नैतिकता, देशप्रेम रुजवणे व सत्यनिष्ठेचे प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात १५ लाखांपेक्षा जास्त स्काऊट व गाईडस् यांना चळवळीत आणणे, त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा आपला प्रयत्न असेल. प्रत्येक विभागवार ट्रेनिंग सेंटरचा विकास करणे, चळवळीला चांगली गती देऊन मुलांमध्ये देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्याचा व नीतिवान नागरिक निर्माण करण्याचा आपला उद्देश आहे. चांगल्या कार्यासाठी स्काऊट व गाईड सज्ज आहेत, असेही ज्ञानोबा मुंढे यांनी सांगितले.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम क्रीडा महोत्सवास प्रारंभ

**व्हॉलीबॉल :** स. भु. प्रशालेस दुहेरी मुकुट

**औरंगाबाद :** स. भु. शिक्षण संस्था आणि ॲडव्होकेटस् स्पोर्टस् ॲंड कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठवाडा मुक्तिसंग्राम क्रीडा महोत्सवास आज प्रारंभ झाला.

क्रीडा महोत्सवाअंतर्गत व्हॉलीबॉल स्पर्धेत स.भु. प्रशालेने १४ व १७ वर्षांखालील गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट मिळवला. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात कर्मवीर शंकरसिंग नाईक संघाने अजिंक्यपद पटकावले. उपविजेतेपद बळीराम पाटील संघाने, तर शारदा मंदिर कन्या प्रशालेने तृतीय क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात बळीराम पाटील संघ अजिंक्य ठरला. उपविजेतेपद कर्मवीर शंकरसिंग नाईक संघाने मिळवले. शारदा मंदिरचा संघ तृतीयस्थानी राहिला. बळीराम पाटील संघाने १४ व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद पटकावले. तत्पूर्वी राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले.

या प्रसंगी आ. अतुल सावे, संस्थेचे सरचिटणीस दिनेश वकील, ॲड. गोपाल पांडे, अनिल मकरिये, राजू वैद्य, राजू बागडे, सुनील सुतवणे, रामकृष्ण जोशी, जुगलकिशोर धूत, मिलिंद रानडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संकर्षण जोशी यांनी केले.

## नांदेड, लातूर संघ विजयी

**नांदेड : स्वामी** रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या आंतर महाविद्यालयीन विभागीय बास्केटबॉल स्पर्धेच्या साखळी लढतीत मुला-मुलींच्या गटात नांदेड व लातूर संघाने प्रतिस्पर्धी संघावर मात करुन आघाडी घेतली.

स्पर्धेत मुलांच्या गटात परभणी संघाने हिंगोलीवर २०-१० ने मात केली. दुसऱ्या लढतीत नांदेड संघाने परभणीचा ४७-१० असा एकतर्फी पराभव केला. तिसऱ्या लढतीत लातूर संघाने हिंगोलीवर २४-२ अशी सहज मात केली. नांदेड विरुद्ध हिंगोली या चौथ्या लढतीत नांदेड संघाने ४१-२ असा पराभव केला. लातूर विरुद्ध परभणी या शेवटच्या लढतीत लातूर संघाने परभणीचा २२-१२ असा पराभव केला. मुलींच्या गटात लातूर संघाने परभणीवर १२-६ असा विजय मिळविला. दुसऱ्या लढतीत नांदेड संघाने परभणीवर १२-३ अशी सहज मात केली.











